# ‘मेट्रो ३’मध्ये नेटवर्क फुल्ल

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईच्या लोकलमध्ये अनेकदा आपण प्रवास करताना गाडी बोगद्यात गेली तर मोबाईलचे नेटवर्क गायब होते. मात्र, आता या त्रासापासून मुंबईकरांची सुटका होणार आहे, कारण मेट्रो रेल कॉर्पोरेशनने इंटरनेट सुविधा वापरासंदर्भातील अडचणींवर मात करत मेट्रो ३ मध्ये जमिनीच्या खाली सुद्धा मोबाईल नेटवर्क सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासाठी जमिनीखाली २० मीटर खोलीपर्यंत अँन्टेना बसविले जाणार आहेत.

मुंबईतील भूमिगत मेट्रो-३ हा पहिला भूमिगत प्रकल्प असून त्याचे काम दोन टप्प्यात केले जाणार आहे. यात पहिल्या टप्प्याचे काम ९१ टक्के तर दुसऱ्या टप्प्याचे काम ७९ टक्के पूर्ण झाले आहे.

मेट्रो ३ भूमिगत मेट्रो मार्गिकेतून प्रवास करणाऱ्यांना मोबाईल वापरताना मोठी अडचण येणार होती. कारण जमिनीखाली असून मोबाईलचे नेटवर्क कसे मिळणार? असा प्रश्न मेट्रो रेल कॉर्पोरेशनला पडला होता. या मार्गिकेतील तिकीट खिडक्या जमिनीच्या खाली १०.१४ मीटर तर प्रत्यक्ष स्थानकांचे फलाट हे जमिनीच्या खाली १८ ते २० मीटर खोलीवर आहेत. त्यामुळे भुयारी मार्गात इंटरनेट सेवा उपलब्ध करणे प्रकल्पातील एक आव्हान होते.